**शुध्दीपत्रक:-**

**केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणीसंदर्भात उपाययोजना व सहाय्य करणे.**

# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

**गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१**

---

**जा.क्र.एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा./** ET-522 **/२०२०.**
**दिनांक:** 16/12/2020

**संदर्भ :** १) वित्त विभाग महाराष्ट्र शासनाचा दि.२९/०७/२०२० रोजीचा शासन निर्णय

२) उपाध्यक्ष/प्रा यांचे परिपत्रक एमएच/मुअ-१/काअ-१/प्रा/ET-३६६/२० दि.१४/१०/२०२०

३) वित्त विभाग महाराष्ट्र शासनाचे दि.०१/१२/२०२० रोजीचे शासन पूरकपत्र क्र. संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२

४) मुख्य अभियंता-१/प्रा यांची कार्यालयीन टिप्पणी क्र.ET-४९ दि.७/१२/२०२० वर मा.उपाध्यक्ष/प्रा यांनी मुक्र.ET-४४ दि.१६/१२/२०२० अन्वये दिलेली मान्यता.

**प्रस्तावना:-**

राज्यात कोरोना साथीच्या प्रादूर्भावामुळे म्हाडाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना करणे व त्यांना सहाय्य करणे आवश्यक असून त्यादृष्टीने वित्त विभागाच्या दि.२९/०७/२०२० रोजीच्या शासन निणयान्वये म्हाडातील कामांच्या अटी व शर्तीनुसार लागू असेल त्या कामांकरीता दि.१४/१०/२०२० रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा केल्या आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे परिपत्रकान्वये उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या. वित्त विभाग महाराष्ट्र शासनाने शासन पुरकपत्र क्र.संकीर्ण-१०२०/प्र.क्र.१००/२०२०/व्यय-१२ दि.०१/१२/२०२० अन्वये पूर्वीच्या दि.२९/०७/२०२० रोजीच्या शासन निर्णयात सुधारणा केल्या आहेत. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे परिपत्रक क्र.ET-३६६ दि.१४/१०/२०२० मधील सूचना क्र.४ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

४. ज्या कंत्राटांमध्ये (उदाहरणार्थ, बांधा-वापरा-हस्तांतरीत करा, ई.पी.सी, मॉडेल) **कामगिरीसाठी अनामत रक्कम (Performance Security)** बँक हमीच्या स्वरुपात घेण्यात येते, अशा प्रकरणी जिथे सदर रक्कम कंत्राटातील रक्कमेच्या ३% हून अधिक असेल, तेथे ती ३% एवढी मर्यादित करण्यात यावी व उर्वरीत अधिकची हमीची रककम ज्या स्वरुपात असेल त्या स्वरुपात कंत्राटदारास, कामाच्या प्रगतीचा विचार न करता विनाशर्त परत करण्यात यावी.

४.(अ) याशिवाय ज्या कामांमध्ये अनामत रक्कम अशाप्रकारे ३% मर्यादित केली आहे, अशी व अन्य कामे जेथे अनामत रक्कम मुळातच ३% पेक्षा कमी आहे, अशा प्रकरणी ५०% हून अधिक रक्कमेचे पूर्ण झाले असेल तर ज्याप्रमाणात काम पूर्ण झाले आहे त्याच्या ५०% प्रमाणात हमीची रक्कम कंत्राटदारास विनाशर्त परत करण्यात यावी.

C:\Users\acer\Desktop\shasan nirnay\Latest shudhapatrika ET 16.12.2020-44.docx

Scanned with CamScanner

(१) उदाहरणादाखल समजा एक काम ज्याची किंमत ५ कोटीहून अधिक आहे व अनामत रक्कम ५% आहे व काम ६०% पूर्ण झाले आहे अशाप्रकरणी कंत्राटदारास खालील प्रमाणे सवलती प्राप्त होतील.

I. अनामत रकमेत कपात-२% (वरील ४ प्रमाणे)

II. ३% अनामत रकमेतून ६०% काम पूर्ण झाल्यामुळे =(३% × ६०%/२)=०.९% (वरील ४ अ प्रमाणे) अशाप्रकारे एकूण ५% पैकी २.९% एवढी अनामत रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल व २.१% एवढी अनामत रक्कम ठेवून घेण्यात येईल.

(२) समजा एक काम ज्याची किंमत रु.५ कोटी आहे व ज्यासाठी अनामत रक्कम ५% एवढी घेण्यात आली आहे व काम ४०% पूर्ण झाले आहे, त्याप्रकरणी

I. अनामत रकमेत कपात ५% -३%=२%

II. मात्र काम ५०% हून कमी झाले असल्याने वरील ४(अ) नुसार काहीही सवलत मिळणार नाही म्हणून एकूण सवलत ५% अनामत रकमेपैकी २% परत करण्यात यावी.

४(ब) वरील सुविधा ज्याप्रकरणी दि.१५ मार्च, २०२० पूर्वी निविदा शर्तीचा अन्यथा भंग झाला नसेल, अशा रु.५०० लक्ष पेक्षा अधिक रकमेच्या कंत्राटांना लागू राहतील.

विषयांकित बाबतीत यापूर्वीचे परिपत्रक क्र.३६६, दिनांक १४/१०/२०२० मधील इतर तरतुदीत कुठलाही बदल होणार नाही.

सदरबाबतच्या सुधारणा तात्काळ अंमलात येतील.

[signature] १६।१२।२०

मा. उपाध्यक्ष/प्रा. यांच्या मान्यतेने.

**मुख्य अभियंता-१**
**प्राधिकरण**

**प्रति:-**

- मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण.
- मुख्य अभियंता-१,२,३/प्राधिकरण.
- वित्त नियंत्रण/प्राधिकरण.
- सचिव/प्राधिकरण.
- मा.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी/प्राधिकरण यांचे स्वियसहाय्यक.
- मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
- मुख्य अधिकारी, मुंबई इमारत व पुनर्रचना मंडळ.
- मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ/पुणे/औरंगाबाद/नाशिक/नागपूर/ कोंकण/अमरावती मंडळ.
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण.



Scanned with CamScanner

**माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

- उपमुख्य अभियंता - दक्षता व गुण नियंत्रण कक्ष / प्रा., पी.एम.ए.वाय कक्ष/प्रा., पी.पी.डी./मुं.मं., पश्चिम/मुं.मं., पुर्व/मुं.मं., मुं.झो.सु. मंडळ, कोंकण मंडळ, पुणे मंडळ, नाशिक मंडळ, औरंगाबाद मंडळ, अमरावती मंडळ, नागपूर मंडळ यांना आपल्या अधिनस्त अधिकारी/ कर्मचारी यांना परिपत्रकाची प्रत अग्रेषित करण्यासाठी
- मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्राधिकरण.
- कार्यकारी अभियंता-१/२/३/प्राधिकरण.
- मुख्य लेखापरिक्षक / म्हाडा.
- मुख्य लेखाधिकारी - मुंबई मंडळ/मुं.ई.दु. व पु. मंडळ / मुं.झो.सु. मंडळ / कोंकण मंडळ / पुणे मंडळ / नाशिक मंडळ / औरंगाबाद मंडळ / अमरावती मंडळ / नागपूर मंडळ.



Scanned with CamScanner